RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2014–16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक १२३] बुधवार, फेब्रुवारी ५, २०१४/माघ १६, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक ४ फेब्रुवारी २०१४

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीए-२०१३/प्र.क्र. २४/वित्त-९.—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. पाच) याच्या कलम २७४ चे पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) चे खंड (वीस-अ), (वीस-ब) आणि (शेहेचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे ठरविले आहे त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, त्यामुळे बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, हा मसुदा दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, प्रधान सचिव (ग्रामविकास व पंचायतराज), महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांचेकडे उपरोक्त दिनांकापूर्वी प्राप्त होतील, त्या शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**नियमांचा मसुदा**

१. या नियमांना, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता (सुधारणा) नियम, २०१४, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम ६४ मधील पोट-नियम (२) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

"(२) मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गट विकास अधिकारी, जिल्हा निधीची प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी रोकड वहीत दिसून येणारी अखेरची शिल्लक प्रादेशिक सहसंचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर यांना त्या वर्षाच्या १० एप्रिल रोजी किंवा त्यापूर्वी ई-संदेशाने किंवा शीघ्र-डाकेने कळविल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एकनाथ मोरे,**
शासनाचे सहसचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001, dated the 4th February 2014

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPA-2013/CR. 24/Vitta-9.—The following draft rules further to amend the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Account Code, 1968, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section *(1)* and clause *(xx-i)*, *(xx-ii)* and *(xlvi)* of sub-section *(2)* of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and of all other powers enabling it in that behlaf, is hereby published as required by sub-section *(3)* of the said section 274, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 15th day of February 2014.

2. Any objection or suggestions which may be received by the Principal Secretary (Rural Development and Panchayatraj) to the Government of Maharashtra, Rural Development and Water Conservation Department, Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date will be considered by the Government.

### Draft Rules

1. These rules may be called the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Account Code (Amendment) Rules, 2014.

2. In rule 64 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samits Account Code, 1968, for sub-rule (2), the following shall be substituted, namely :—

"(2) The Chief Executive Officer and the Block Development Officer shall communicate the closing balance of the District Fund on 31st March each year as revealed by the Cash Book by E-mail or Speed-Post to the Regional Joint Director, Local Fund Audit, Mumbai, Pune, Nashik, Aurangabad, Amravati and Nagpur on or before the 10th April of that year.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

EKNATH MORE,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.